
प्रकरण चौथे

# समारोप व निष्कर्ष



### प्रकरण ४ थे

# समारोप व निष्कर्ष

श्री. पु. ल. देशपांडे हे महाराष्ट्रातील एक अष्टपैलू कलावंत साहित्य, नाट्य, संगीत, चित्रपट, या क्षेत्रात त्यांनी अपूर्व कामगिरी करुन आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमठविला आहे. साहित्यक्षेत्रातील त्यांचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. व्यक्तिचित्रे, कथा, नाटके, अशा विविध वाङ्मय प्रकारांचे त्यांनी लेखन केले असून त्यात प्रवासवर्णने हा एक वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मय प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळला आहे. 'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग' ही त्यांची प्रवासवर्णने इतकी वाचकप्रिय झाली आहेत की, इ. स. १९६० पासून इ. स. १९९९ या कालखंडात अपूर्वाईच्या १६ आवृत्तया आणि पूर्वरंगाच्या १९९३ ते १९९८ पर्यंत ११ आवृत्या निघाल्या. त्यांच्या समग्र साहित्यसृष्टीत या दोन साहित्यकृर्तींना महत्वाचे स्थान असल्याने त्यांच्या या दोन साहित्यकृती लघुप्रबंधासाठी निवडल्या आहेत.

**अ)** पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या दोन साहित्यकृती प्रवासवर्णनपर आहेत. प्रवासवर्णन हा एक आधुनिक वाङ्मय प्रकार आहे. या वाङ्मय प्रकाराचा 'ललितगद्य' या वाङ्मय प्रकाराशी संबंध असल्याने त्या दोहोतील अनुबंधाचा प्रथम तात्विक विचार करुन लघुनिबंधातून प्रवासवर्णनपर लेखनाचा विकास कसा झाला हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

ललित वाङ्मयाचे कथा, कादंबरी, नाटक, कविता, निबंध असे जे विविध प्रकार आहेत. त्यामध्ये ललित निबंध हा एक प्रमुख वाङ्मय प्रकार आहे. इंग्रजी वाङ्मयातून मराठीत जे वाङ्मय प्रकार आले त्यापैकी ललितनिबंध हा सर्वात आधुनिक वाङ्मय प्रकार आहे. १९२५–२६ च्या दरम्यान प्रा. ना. सी. फडके व वि. स. खांडेकर या दोन्ही साहित्यकांनी हा वाङ्मय प्रकार समर्थपणे हाताळला व लोकप्रिय केला. त्या काळी अशा प्रकारच्या लेखनाला 'हितगुज' 'गुजगोष्टी' 'आत्मनिष्ठनिबंध' अशा प्रकारची नावे देण्यात आली. पुढे मात्र वि. स. खांडेकरांमुळे अशा प्रकारच्या लेखनाला 'लघुनिबंध' ही संज्ञा प्राप्त झाली लघुनिबंधामध्ये दैनंदिन जीवनातील हलकाफुलका, परिचित विषय घेऊन लेखक आपल्या मनातील विचाराचा मुक्तपणाने आविष्कार करीत असे. म्हणून लघुनिबंध म्हणजे काय? त्याचे विषय कसे असतात? त्याची वैशिष्ट्ये कोणती, याची प्रारंभी तात्विक चर्चा पहिल्या प्रकरणात केली आहे. लघुनिबंध हा लेखकांतील 'मी' चा मुक्त आविष्कार असल्याने प्रत्येक लेखकाच्या प्रवृत्तीनुसार त्याचे स्वरुप हळूहळू कसे पालटत गेले हे ही स्पष्ट केले आहे. त्यामुळे काही लेखकांचे लघुनिबंध कथेसारखे, काहींचे व्यक्तिचित्रणासारखे,

काहींचे आत्मचित्रण सारखे, तर काहींचे कल्पना विलासासारखे निर्माण झाले आहेत. त्यामुळे लघुनिबंधामध्ये अनेक प्रकारची विविधता आढळते. अशी विविधता आढळत असली तरी त्या सर्वच लेखन प्रकाराचा केंद्रबिंदू लेखकामधला 'मी' असे प्रवासवर्णन हा लेखन प्रकारही लेखकामधील 'मी' चा मुक्त आविष्कार असल्याने या लेखनप्रकाराचा लघुनिबंधाशी जवळचा संबंध आहे. लघुनिबंधाचे कालांतरानी ललितनिबंधात रुपान्तर झाले. अगदी अलिकडच्या कालखंडात (स्वातंत्र्योत्तर) त्याला ललितगद्य अशी संज्ञा प्राप्त झाली आणि लघुनिबंध, ललितनिबंध, व्यक्तिचित्रे, स्थळवर्णने, प्रवासवर्णन हे त्याचे उपप्रकार समजण्यात येऊ लागले म्हणजे, 'लघुनिबंध' या वाङमय प्रकारातून प्रवासवर्णन या वाङमय प्रकाराचा जन्म झाला. असे म्हटले जाते. त्या दृष्टीने प्रवासवर्णनपर लेखनाचा ललितगद्यातील इतर प्रकाराशी संबंध कसा पोहचतो हे स्पष्ट करुन त्यातील साम्य भेद कोणते याची चर्चा केली आहे. त्यानंतर या पहिल्या प्रकरणात प्रवासवर्णन हा एक स्वतंत्र वाङमय प्रकार का व कसा आहे. याची सविस्तर चर्चा केली आहे. प्रवासवर्णन म्हणजे काय? त्याची व्याख्या कोणती? प्रवासवर्णनपर साहित्याचे मुख्य घटक कोणते? त्या लेखन प्रकाराच्या पाठीमागे कोणत्या प्रेरणा असतात या प्रश्नांच्या आधारे प्रवासवर्णनपर साहित्याचे स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. आहे प्रवास ही एक आदिम प्रवृत्ती असून अनेक हेतूंनी प्रवास केला जातो. तथापि असा प्रवास करणाऱ्याच्या अनुभवांना, अनुभवाच्या अभिव्यक्तीला प्रवासवर्णनपर साहित्य असे म्हणता येईल असे नाही. प्रतिभाशक्ती प्राप्त झालेल्या कलावंताने जाणीवपूर्वकतेने प्रवास केला आणि प्रवासात येणाऱ्या अनुभवांची कलात्मक अभिव्यक्ती केली. तरच त्या लेखनाला वाङमयीन रुप प्राप्त होते आणि त्याला प्रवासवर्णनपर साहित्य म्हणता येते. डॉ. वसंत सावंत यांनी प्रवासवर्णनपर साहित्याचे जे मुख्य तीन घटक मानले आहेत. त्याच्या आधारे प्रवासवर्णनपर साहित्याचे स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यानंतर मराठीत प्रवासवर्णनपर साहित्य लिहिण्याचा कोणी कोणी प्रयत्न केला त्याचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. प्राचीन काळातील साधुसंत, महानुभव पंथातील प्रचारक काही पंडीत व शाहीर कवी, यांच्या लेखनात प्रवासवर्णनपर साहित्याच्या पाऊलखुणा आढळत असल्या तरी त्यांच्या लेखनाला खऱ्या अर्थाने प्रवासवर्णनपर साहित्य म्हणता येणार नाही. त्याची कारण मीमांसा करुन आधुनिक काळातच(इंग्रज आल्यानंतर) त्याची खऱ्या अर्थाने निर्मिती होऊ लागली. कारण या वाङमय प्रकाराची जाणीव दळणवळणाची साधने, वाढते सांस्कृतिक व्यवहार यामुळे प्रवासवर्णनपर साहित्याला प्रेरणा मिळाली. त्यामुळे अनंत काणेकरांच्या 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे'

या प्रवासवर्णनामुळे मराठीत खऱ्या अर्थाने प्रवासवर्णनपर साहित्याला सुरुवात झाली. असे का म्हटले जाते ते स्पष्ट केले आहे आणि मराठीतील प्रवासवर्णनपर साहित्याचा परामर्श घेतला आहे.

याच प्रकरणात 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' हे प्रवासवर्णनपर साहित्य लिहिणारे पु. ल. देशपांडे यांच्या जीवन चरित्राचा आणि त्यांच्यावर झालेल्या विविध संस्काराचा परामर्श घेतला आहे. उपजिवीकेसाठी विविध ठिकाणी कराव्या लागणाऱ्या नोकऱ्या, नाट्य व चित्रपट सृष्टीत, प्रवेश केल्याने आलेले अनुभव, नाट्य व संगीत या कलांची त्यांना असलेली आवड, लेखनाची प्रेरणा, त्यांनी विविध वाङ्मय प्रकाराचे केलेले लेखन या मुद्द्याच्या आधारे चर्चा करुन त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनाच्या पाठीमागे कोणकोणत्या प्रेरणा होत्या. ते स्पष्ट केले आहे.

**ब)** पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनातील आशय सौंदर्याचे स्पष्टीकरण प्रकरण दोन मध्ये केले आहे. प्रवासवर्णनवर लेखनात 'प्रवासातील अनुभव' हा एक महत्वाचा घटक आहे. कारण कोणत्याही प्रकारच्या साहित्यात लेखकाच्या अनुभवांची अभिव्यक्ती असते. या प्रकरणात अपूर्वाईतील पाश्चात्य देशांचा प्रवास का केला तसेच 'पूर्वरंग'मधील पूर्वेकडील देशाचा प्रवास का केला. त्या संबंधीची भूमिका विशद केली आहे. पाश्चात्य व पौर्वात्य देशातील प्रवास करताना त्यांना कोणकोणत्या प्रकारचे अनुभव आले आणि त्या अनुभवांचा पु. लं. नी कसा आविष्कार केला आहे. त्यांचे प्रथमतः चित्रण केले आहे. प्रवासवर्णनपर साहित्याचा दुसरा महत्वाचा घटक म्हणजे 'प्रदेशवर्णन' होय. पु. लं. नी पाश्चात्य व पौर्वात्य प्रदेशांतून प्रवास करताना ज्या ज्या निसर्गस्थळांना, ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या. चित्र प्रदर्शने पाहिली. वस्तुसंग्रहालयांना भेटी दिल्या. त्या वेळेला त्यांना जो अनुभव आला. त्यांच्या मनात जे विचार आले. त्यांचा परामर्श घेतला आहे. तसेच त्या प्रदेशातील लोकजीवनातील संस्कृतीचे जे दर्शन घडले त्या संस्कृतीतील गुणदोषांचे त्यांनी जे चित्रण केले आहे. त्याचा ही परामर्श घेतला आहे. त्याचे चित्रण करताना त्यांच्या मनात आपली संस्कृती आणि पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृती यात जो विरोध जाणवला त्याचे चित्रण केले आहे.

या प्रवासात पु. लं. ना काही वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती भेटल्या त्याचे त्यांनी या दोन्ही पुस्तकात मिष्कीलपणे कसे वर्णन केले आहे हे दाखविले आहे. या व्यक्तीमध्ये चांभार, शिंपी, वेटर, पोलिस(बॉबी)या सारख्या सामान्य व्यक्तीप्रमाणे नाट्य व संगीत क्षेत्रातील प्राध्यापक, कलावंत अशा असामान्य व्यक्तिंचीही त्यांनी जी सुरेख शब्दचित्र रेखाटली आहेत त्याचे स्वरुप विशद केले आहे.

इतरांची व्यक्तीचित्रे रेखाटताना पु. लं. नी मधून मधून स्व चित्रणही केले आहे. आपली मध्यमवर्गीय जाणीव, पारंपारिकता, भोळेपणा, गबाळेपणा यासारख्या अनेक गुणांचे दर्शन कसे घडविले आहे हे सोदाहरण स्पष्ट केले आहे.

पु. ल. देशपांडे यांचा पिंड विनोदी लेखकाचा असला तरी त्यांच्यामध्ये चिंतनशीलतेचा एक अंश आहे. त्यामूळे प्रवासात जे विविध अनुभव आले, प्रसंग आले, व्यक्ती भेटल्या, त्यांच्या संबंधी त्यांनी काही भाष्य केले आहे. त्यांच्या या दोन्ही प्रवासवर्णनातील पुस्तकांत कोणकोणत्या प्रकारची जीवनभाष्ये आली आहेत. याचा सोदाहरण परामर्श घेतला आहे.

**क)** तिसऱ्या प्रकरणात पु. ल. देशपांडे यांनी जे प्रवासवर्णन केले आहे. त्या वर्णनाच्या आधारे त्या वर्णनातून त्यांच्या व्यक्तिमत्वाची कोणती वैशिष्ट्ये दिसून येतात त्यांच्या आणि निवेदन व भाषाशैलीची कोणती वैशिष्ट्ये आहेत याचे विवेचन केले आहे. विनोदी वृत्ती, कलाप्रेम, माणूसप्रियता, मध्यमवर्गीय जाणीव, संस्कृतीप्रेम, संस्कृती विरोध, चिंतनशीलता, आत्मपरीक्षण आणि काव्यप्रेम ही व्यक्तित्वाची त्यांची वैशिष्ट्ये. प्रवासवर्णनातून कशी आढळतात ते स्पष्ट केले आहे.

पु. लं. च्या सर्वच लेखनाचा केंद्रबिंदू विनोद हा आहे. म्हणून विनोदाची व्याख्या, स्वरुप, प्रकार यांची तात्विक चर्चा करुन पु. लं. च्या या प्रवासवर्णनपर लेखनात विनोदाचा कसा आविष्कार झाला आहे हे स्पष्ट केले आहे.

त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनात त्यांनी कोकणी भाषेचा, परकीय भाषांचा, संस्कृत भाषेचा उपयोग केल्याने त्यांच्या प्रवासवर्णनातील भाषा वैशिष्ट्यपूर्ण बनली आहे. शिवाय परकीय कल्पनांचे मराठीकरण आणि नाट्य–संगीत क्षेत्रातील परिभाषा वापरल्यामुळे त्यांच्या प्रवासवर्णनातील निवेदनाच्या भाषाशैलीला एक वेगळे स्वरुप कसे प्राप्त झाले आहे, हे सोदाहरण दाखविले आहे. त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनात अनेक ठिकाणी काव्यमय व चित्रमय भाषाशैलीचा उपयोग केल्यामुळे त्यांच्या लेखनात जे सौंदर्य निर्माण झाले त्याचाही परामर्श घेतला आहे.

पु. ल. देशपांडे यांनी ‘अपूर्वाई’ व ‘पूर्वरंग’ या दोन्ही प्रवासवर्णनपर पुस्तकांत जो आशय व्यक्त केला आहे आणि त्या आशयाची अभिव्यक्ती ज्या पध्दतीने केली आहे. त्यांच्या आधारे काही निष्कर्ष नमूद करावेसे वाटतात.

१) लघुनिबंध या वाङमय प्रकाराचा विकास होता होता ललितगद्याचे जे विविध उपप्रकार निर्माण झाले त्यापैकी प्रवासवर्णन हा एक स्वतंत्र वाङमय प्रकार निर्माण झाला आहे.

२) ललितगद्यामध्ये विषय कोणताही असला तरी लेखन करणाऱ्या लेखकातील 'मी' हा त्या लेखनाच्या केंद्रस्थानी असतो. आणि प्रवासवर्णनाच्या लेखनाच्या केंद्रस्थानही 'मी' चा अनुभव असल्याने प्रवासवर्णन हा ललितगद्याचा एक प्रकार आहे. असे म्हटले जाते.

३) मराठी साहित्यात प्रवासवर्णनपर लेखन भरपूर झाले असले तरी त्याची वाङ्मयीन समीक्षा फारशी झाली नाही. अपवाद प्रा. वसंत सावंत यांच्या प्रवासवर्णन : एक वाङ्मय प्रकार या प्रबंधाचा.

४) पु. ल. देशपांडे यांची 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या दोन्ही प्रवासवर्णनपर पुस्तके गाजली याचे कारण त्यांनी प्रवास केलेल्या प्रदेशाचे वर्णन त्या प्रदेशातील संस्कृतीचे वर्णन हे असले तरी मध्यमवर्गीय जाणीवेतून त्यांनी जो संस्कृती– विरोध स्पष्ट केले आहे. आणि विनोदाच्या माध्यमातून वर्णन केले आहे. ही कारणे महत्वाची आहेत.

५) या प्रवासवर्णनांत त्यांनी अनेक सुंदर व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्या दोन्ही प्रवासात त्यांच्या सोबत त्यांची पत्नी असताना ही त्यांनी प्रवासातील अनुभव पत्नीचे स्वभाव चित्र का रेखाटले नाही? त्या संबंधी मौन का बाळगले? असा एक प्रश्न पडतो.

६) या प्रवासवर्णनात पु. ल. देशपांडे यांनी स्वतःचेही जे चित्रण केले आहे वैशिष्ट्यपूर्ण मानावे लागते.

७) पु. ल. देशपांडे यांच्या या दोन्ही प्रवासवर्णनातील त्यांचे संस्कृती प्रेम, नाटय व संगीतप्रेम प्रकर्षाने जाणवते.

८) या दोन्ही प्रवासवर्णनांत त्यांनी प्रवासात घेतलेले अनुभव हे मध्यमवर्गीय जाणीवेतून घेतले आहेत हे सातत्याने जाणवते.

९) कोकणी भाषा, मराठी नाट्य संगीत क्षेत्राची परिभाषा, परकीय कल्पनाचे केलेले मराठीकरण, संस्कृत शब्द व सुभाषिते यांच्या मिश्रणांतून त्यांची भाषाशैली वैशिष्टपूर्ण बनली आहे.

१०) विनोद हा त्यांच्या सर्व साहित्याचा प्राणबिंदू असल्याने त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनात विनोदाचा आविष्कार होणे स्वाभाविक आहे. परंतू विनोदाच्या इतर प्रकारांपेक्षा शब्दनिष्ठ विनोदातील कोटीबाजपणा हा त्यांचा आवडता प्रकार आहे असे वाटते.

११) पु. ल. देशपांडे यांचे मन नेहमी आपली संस्कृती व परकीय संस्कृती यांच्या साम्यभेदात गुंतल्याने कोणत्याही प्रसंगात ते समरसून एकाग्र झाले आहेत असे जाणवत नाही. त्यामूळे त्यांची दोन्ही प्रवासवर्णने वाचकांना आवडत असली तरी उत्कटतेच्या बाबतीत ते कमी

पडतात असे वाटते.

१२) पु. लं. च्या संपन्न व्यक्तिमत्वाचा आणि विनोदवृत्तीचा त्यांच्या या दोन्ही लेखनातून मनोरम आविष्कार झाला आहे.

**पु. लं. चे मराठी साहित्यात योगदान :**

पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या दोन प्रवासवर्णनात्मक लेखनाच्या पाठीशी असणाऱ्या प्रेरणा, त्यातील आशय सौंदर्याची वैशिष्ट्ये, त्यातील अभिव्यक्तिसौंदर्याची वैशिष्ट्ये यांची चर्चा करुन त्या आधारे त्यांच्या व्यक्तिमत्वाची कोणती वैशिष्ट्ये दिसून येतात. याची मीमांसा या लघुप्रंधाच्या तिन्ही प्रकरणात केली आहे.

**प्रवासवर्णन साहित्यातील पु. लं. चे स्थान :**

पु. ल. देशपांडे यांनी ही जी दोन प्रवासवर्णने लिहिली त्यानंतरही त्यांनी 'वंगचित्रे' व जावे त्यांच्या देशा' ही दोन प्रवासवर्णने लिहिली. परंतु प्रस्तुतच्या लघुप्रबंधासाठी 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' ही जी दोन पुस्तके निवडली आहेत त्यात त्यांच्या प्रवासलेखनाची आणि व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये ठळकपणे व्यक्त झाली आहेत. मराठीत अनेकांनी प्रवासवर्णने लिहिली असली तरी 'विनोद' या माध्यमातून फार थोडी लिहिली गेली. जी लिहिली गेली त्यामध्ये पु. लं. ची ही दोन पुस्तके त्यांच्या वाङ्मयीन गुणांमुळे, त्यातील विनोदसौंदर्यामुळे अत्यंत लोकप्रिय, वाचकप्रिय झाली. वाचक, रसिक व समीक्षक यांनी त्यांच्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या दोन्ही प्रवासवर्णनात्मक साहित्यकृतींचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. कारण इतरांच्या प्रवासवर्णनापेक्षा पु. लं. नी एका वेगळ्या दृष्टिकोनातून हे लेखन केले आहे. ज्या देशांच्या प्रवास केला तेथील निसर्ग, तेथील माणसे, त्यांच्या प्रवृत्ती, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन, त्या पार्श्वभूमीवर आपले भारतीय व महाराष्ट्रीय जीवन यांचे त्यांनी जे मार्मिक वर्णन केले आहे आणि त्या वर्णनाला 'विनोदा'ची जी जोड दिली आहे. त्यामुळे त्यांची ही दोन्ही प्रवासवर्णने मराठीत परंपरेपेक्षा वेगळी ठरली आहेत. विनोदाच्या माध्यमातून लोकजीवनाचा अर्थपूर्ण शोध हा त्यांच्या प्रवासवर्णनात्मक लेखनाचा महत्वाचा व अभिनव विशेष असल्याने त्यांच्या या दोन्ही प्रवासवर्णनपर साहित्याने मराठी प्रवासवर्णनपर साहित्यातच नव्हे तर एकंदरीत समग्र साहित्यात महत्वाची भर घातली आहे. या दोन्ही पुस्तकांच्या निघालेल्या अनेक आवृत्त्या हेच दर्शवितात की, त्यांची प्रवासवर्णने कालातीत आहेत. वाचकांना ती आज आवडतात आणि पुढेही आवडत राहतील. एका वेगळ्या पध्दतीने प्रवासवर्णन लिहून पु. लं. नी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. हे त्यांचे फार मोठे योगदान आहे.